Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**संदर्भ:- जा.क्र.आस्थापना-२/३६७ दि. ३१/०७/२०२३**

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकान्वये 'राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना ही अधिकार मंडळाच्या दि.१९/०७/२०२३ रोजीच्या **निर्णयानुसार जे शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी / अधिकारी स्विकृती देतील त्यांच्या वेतनातून वर्गणी कपात करून सदर विमा योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे.** त्यानुसार विद्यापीठ वेतन अनुदानाखालील जे शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी 'राज्य शासकीय समूह वैयक्तिक अपघात विमा योजना' याचा लाभ घेऊ इच्छितात त्यांनी **सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील जोडपत्र-६ नुसार दि.३०/११/२०२३ पर्यंत आस्थापना-२ विभागात स्विकृती देण्यात यावी.** असे कळविण्यात आले होते.

आता, दि.२३/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत अधिकार मंडळाने दि. १९/०७/२०२३ रोजीच्या निर्णयामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती केली आहे.

**ठराव : १) विद्यापीठातील वेतन अनुदानावरील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी / अधिकारी यांचेसाठी परिपत्रक निर्गमित करून सदर योजनेची स्विकृती घेण्यात यावी.**

**२) जे शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी / अधिकारी स्विकृती देतील त्याच्या विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीतून वर्गणी कपात करून सदर विमा योजना लागू करावी.**

**३) जे शिक्षक व अधिकारी विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीचे सभासद नाहीत त्यांची स्विकृती घेवून त्यांच्या वेतनातून वर्गणी कपात करून सदर योजना लागू करावी.**

सबब,

१) उपरोक्त ठरावानुसार जे शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी **दि. ३१/०७/२०२३** रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार स्विकृती देतील त्यांची वर्गणी कल्याण निधीतून कपात करून विमा योजना लागू करण्यात येईल.

२) वेतन अनुदानाखालील शिक्षक सेवकांना विद्यापीठ कल्याण निधी योजना लागू नसल्याने, ज्या शिक्षक सेवकांनी दि. ३१/०७/२०२३ च्या परिपत्रकानुसार स्विकृती दिली आहे. त्यांची वर्गणी त्यांच्या वेतनातून कपात करण्यात येईल.

३) सदरची वर्गणी ही वित्त विभागाच्या दि.२४/०१/२०२३ च्या शासन निर्णयानुसार गटनिहाय निर्धारीत केलेली वर्गणी व राशीभूत रक्कम खालीलप्रमाणे माहे फेब्रुवारी पेड इन मार्च २०२४ मध्ये कपात करण्यात येणार आहे.

| गट | राशीभूत विमा रक्कम | वार्षिक वर्गणी | वस्तू व सेवाकर | एकूण वार्षिक वर्गणी |
|---|---|---|---|---|
| गट- अ | रू. 25 लाख | रू.750/- | रू.135/- | रू.885/- |
| गट- ब | रू. 20 लाख | रू.600/- | रू.108/- | रू.708/- |
| गट- क | रू.15 लाख | रू.450/- | रू.81/- | रू.531/- |
| गट- ड | रू.15 लाख | रू.450/- | रू.81/- | रू.531/- |

४) विद्यापीठ वेतन अनुदानाखाली जे शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी / कर्मचारी **माहे एप्रिल-२०२१** पासून विद्यापीठ सेवेत नव्याने रूजू झाले आहेत, अशांनीच सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील जोडपत्र-४ व ६ बिनचूक भरून वर नमूद तारखेपर्यंत सादर करावेत.

वर नमूद केल्यानुसार सदरचे अर्ज वेळेत सादर न केल्यास राज्य शासकीय समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा लाभ मिळणार नाही. याची नोंद घ्यावी.

**कुलसचिव**

**सोबत :-शासन निर्णयातील जोडपत्र क्र. ४ व ६**

**जा.क्रं. - आस्थापना-२/** 554

**दिनांक -** 30 SEP 2023

**प्रति,**

**१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

**२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.**

**३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक INTRANET या मथळयाखाली Circulars या सदरात प्रसिध्द करावे.**

**प्रत :- माहितीस्तव.**

**मा.कुलगुरू, मा. प्र.कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, तसेच मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय**

## जोडपत्र - ४

### नामनिर्देशनाचा नमुना

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेखालील लाभासाठी नामनिर्देशन

(१) मी,. ------------------------------------------ **पदनाम** --------------------- याव्दारे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेअंतर्गत रक्कम मला देय होण्यापुर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशावेळी माझा मृत्यु झाल्यास, अशी रक्कम घेण्यास माझ्या कुटूंबातील खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे. आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी.

**किंवा**

(२) मी ------------------------------------------ **पदनाम** --------------------- कुटूंब धारण करीत नसल्यामुळे मला राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजने अंतर्गत रक्कम मला देय होण्यापुर्वी अथवा ती देय झालेली असून, देण्यात आलेली नसेल अशा वेळी माझा मृत्यु झाल्यास, अशी रक्कम घेण्यास खाली निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला/व्यक्तींना नामनिर्दिष्ट करीत आहे आणि असा निर्देश देत आहे की, उक्त रक्कम, तिच्या/त्यांच्या नावासमोर दिलेल्या पध्दतीने उक्त व्यक्तीला/व्यक्तींना देण्यात यावी.

यानंतर मी कुटूंब प्राप्त केल्यानंतर हे नामनिर्देशन अवैध ठरेल.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे व पूर्ण पत्ता | वर्गणी-दाराशी नाते | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीला देय असलेला रकमेचा भाग | ज्या घटना घडल्यामुळे नामनिर्देशन विधी आग्राहय ठरेल अशा आकस्मित घटना | वर्गणीदारांच्या आधी नामनिर्देशि पावल्यास तिचा हक्क ज्या व्यक्तीकडे जाईल त्या व्यक्तीचे/व्यक्तींची नावे, पत्ता आणि नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या प्रकरण ९ मधील नियम क्रं. १११ च्या पोट-नियम ५ मधील कुटूंब या व्याख्येनुसार

ठिकाण :

दिनांक : **वर्गणीदाराची सही**

**साक्षीदारांचे नाव व सही :**

**१.**

**२.**

---

(कार्यालयाच्या उपयोगासाठी)

नामनिर्देशन मिळाल्याचा दिनांक :-

दिनांक कार्यालय प्रमुखाचे पदनाम व सही

**जोडपत्र - ६**

**अनुमतीपत्र**

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------- आपल्या विभागात/कार्यालयात --------------------- या पदावर कार्यरत आहे.

राज्य शासकीय समुह वैयक्तिक अपघात विमा योजनेचा/योजनेची सदस्य होण्यास इच्छूक आहे.

**आपला/आपली**

**(-------------------------------------)**

**स्थळ:**

**दिनांक :**